## दिनांक ०३/०११/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | फ्रेजरपूरा | अप क्रं १७६४/२१ कलम ४५२,४२७, ५०४,५०६ भा द वि | घरात घुसुन घरातील तोडफोड करुन नुकसान करणे व शिवीगाळ व धमकी देणे | निरंक | फिर्यादीचे राहते घर महादेव खोरी अमरावती | दि. ०१/११/२१ चे २०/०० वा | दि. ०२/११/२१ चे ००/५० वा | एक महीला | निखील मधुकरराव सातनुरकर वय ३२ वर्ष रा. महादेवखोरी अमरावती | भेट देणारे अधि पोउपनि राजमल्लु पो स्टे फ्रेजरपूरा अम<br>दि. ०२/११/२०२१ चे ००/३० वा. | हककीत अशा प्रकारे आहे की , यातील फिर्यादी व आरोपी शेजारी राहत असुन नमुद घटणा ता वेळी व ठिकाणी फिर्यादी ही घरी हजर असतांना आरोपी याने फिर्यादी यांचे घरा समोर येवुन शिवीगाळ करुन लागला असता फिर्यादी ह्या घरात निघुन गेल्यावर आरोपी याने फिर्यादी यांच्या घरात एक रॉड घेवुन अवैधरित्या प्रवेश करुन शिवीगाळ करु लागला असता फिर्यादी यांनी त्यास समजाविण्या च्या प्रयत्न केला असता नमुद आरोपी याने फिर्यादी यांच्या घरातील टिव्ही चा काच फोडला व फिर्यादीच्या आंगावर मारण्याकरीता धावुन आला व घरातील साहित्याची तोडफोड करुन नुकसान केले. व फिर्यादीस म्हणाला की तुमचा मुलगा मंगेश याला जेल मधुन सुटुन येवु दे त्याला पाहुन घेतो अशी धमकी दिली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २ | फ्रेजरपुरा | अप.क्र. १७६६/२१ कलम ३२४ भादवि | दुखापत | - | राजेश सांगवा यांचे राहते घरी भाडयाने शाम नगर अमरावती | दि.२/११/२१ चे १६.३० | दि.२/११/२१ चे २२.३३ वा | एक महीला | उत्तमराव गुलाबराव माहोड, वय ५२,रा.माटर गाव, ता दर्यापुर जि.अम. | भेट देणारे अधि व दाखल अधि.- सपोउपनि अजाबराव मोरे, ब.न.९७३, पो स्टे, फ्रेजरपूरा अम. | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि. हि आरोपी सोबत मागील दोन वर्षा पासुन २ मुली व १ मुलगा सह वेगळी का राहते या कारणावरुन फि. आरोपी याने वाद करुन फि. चे उजवे गुडघ्यावर व मांडीवर व डाव्या हाताचे ढोपरावर धारदार लोखंडी पाते असलेली सतुर मारुन फि.स जख्मी केले. असे फि.चे बयानावरुन व मेडी.सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३ | गाडगेनगर अम. | अप.क्र. २७६५/२१ कलम ३५३, २९४, ५०६, ३४ भा.द.वि. | सरकारी कामात अडथळा आणुन अश्लिल शिवीगाळ केली. | | आर.टी.ओ. कार्यालय अमरावती | दि. ०२.११.२०२१ चे १६.४६ वा | दि. ०२.११.२०२१ चे २०.०३ वा. | करण ज्ञानोबा गुट्टे वय ४४ वर्ष. रा. कांचन गौरी बिल्डींग बोर्ड आपीस समोर टोपे नगर अमरावती | अशोक सदाशिव मामुरकर २) महेश अशोकराव मामुरकर दोन्ही रा. अमरावती | पो.उप.नि. ढोके पो.स्टे.गाडगेनगर अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आर.टी.ओ कार्यालय येथे वरिष्ठ लिपीक पदावर कार्यरत असुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीतांना ट्रक क्र. एम.एच-२७- बी.एक्स -३६२४ चे नावावर प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी व कर आनलाईन अदयावत करुन द्या असे म्हटले असता मी त्यांना सांगितले की, टक्स अपडेट करण्याची डयुटी माझी नाही तर या कारणावरुन अशोक मामुरकर यांनी माझेशी वाद घातला व त्यांचे मुलाने माझे डेस्कवर हात मारुन अश्लील |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | शिवीगाळ करुन फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करुन तु बाहेर ये तुला बघुन घेतो अशी धमकी दिली असता फिर्यादीचे कार्यालयातील साजीद अली, आशिष माथुरकर, रवि रुद्रकार, देवेन्दर कळमकर यांनी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला असता नमुद आरोपी यांनी शिवीगाळ करीत निघुन गेले. अशा फि.च्या ज. रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ४ | नागपुरी गेट | ७६२/२१ कलम ३५४, ३५४(ड) भादवी | विनयभंग करणे | निरंक | लालखडी फरजाना किराणा दुकान जवऴ फि चे राहते घर अम. | दि. ०२/११/२१ चे १७/३० वा. | दि. ०२/११/२१ चे १९/५५ वा. | एक महीला | शहजाद खाँ साबिर खाँ उमर वय ३५ रा. लालखडी जाफरिया मस्जीद अम. | पोहेकाँ कैलाश जाधव १२९६ पो.स्टे. ना. गेट अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता. वेऴी व ठिकाणी यातील फिर्यादी हि आपल्या घरा समोर उभी असता यातील आरोपी हा तिला पाहुन तिच्या मागे मागे येवुन तिच्या घरात गेला व तिचा हात धरुन तिचे छातीवरुन हात फिरवुन तिचे सोबत जबरदस्ती करु लागला म्हणुन फि. ही ओरडुन घराचे बाहेर आली तेव्हा बाहेर उभे असलेले फि.ची आई व शेजारी राहणारे महिला यांना पाहुन आरोपी पळुन गेला. अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ५ | वलगाव | ६९२/२०२१ कलम ३७९ भादवी | चोरी करणे | ०३ क्विंटल सोयाबीन किंमत अंदाजे १५,०००/ रुपये | ग्राम टाकरखेडा शंभु शेत शिवार | ३०/१०/२०२१ चे २०/०० वा.ते ३१/१०/२०२१ चे ०८/३० वा. दरम्यान | ०२/११/२०२१ चे १३/५८ वा. | गुणवंत साहेबराव देशमुख वय ६४ वर्षे रा. सुरभी विहार , VMV अमरावती | अज्ञात | ASI दादु दहीकर ब.न ९१९ पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.०२/११/२०२१ चे १४/३० वा. ते १५/०० वा. दाखल अधिकारी ॾ ASI दादु दहीकर ब.न ९१९ पोस्टे वलगाव अमरावती शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादीचे शेत मौजे टाकरखेडा शंभु शेतशिवार गट न. ४७० मध्ये ४ एक्कर शेत असुन त्यानी शेतामध्ये सोयाबीन पेरले होते दि.३०/१०/२०२१ चे रोजी ०८/३० दरम्यान शेतातील सोयाबीन तासात सोंगुन ठेवले होते असता नमुद घटना. ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी आपले शेतातील सोंगुन ठेवलेले सोयाबीनचे गंज पाहणी करण्याकरीता गेले असता ४४ तासमधील सोयाबीनचे गंजातील अंदाजे ०३ क्विंटल सोयाबीन किंमत अंदाजे १५,०००/ रु चे फिर्यादी याना दिसुन आले नाही ते कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेले आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ६ | नांदगाव पेठ | अप.न. ४४३/२०२१ कलम ३२४,५०४ भादवी | दुखापत करने | -- | नांदगावपेठ अमरावती | दि.०२/११/२०२१ चे १९.०० वा | दि. ०२/११/२०२१ चे २१.१९ वा | रामु विठोबा शिंन्दे वय ७० वर्ष रा. नांदगावपेठ अमरावती | देवा रामु शिंन्दे वय ४० वर्ष रा. नांदगावपेठ अमरावती | पोहेका. राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे. नांदगावपेठ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की. यातील फिर्यादी असे कामावरुन घरी परत आले असता फिर्यादीचा मुलगा नामे देवा शिंन्दे व जावाई किसन भोसले हो दोघेही घरी दारु पिवुन आले व आपसात भांडण करत होते व फिर्यादीने म्हटले की, आपसात का भांडता तर देवा शिंन्दे याने फिर्यादीस शिवीगाळ केली व फिर्यादीला म्हटले की ,शिवीगाळ का करतो तर देवा शिंन्दे यांने त्याचा हातातील काहीतरी धारदार वस्तुन फिर्यादीच्या डोक्यावर मारले त्यामुळे फिर्यादीचे डोक्याचे रक्त निघाले,अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्टवरुन व ईर्विनच्या |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | मेडीकल सर्टिफीकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| ७ | पोस्टे राजापेठ | अप क्र १३२२/२०२१ कलम ३८० भादवी | चोरी | एसीआर कंपनिचा लँपटॉप कि अं २५,०००- रू चा माल | कोहीनुर लॉज एम आय डी सी अमरावती | दि ०२/११/२१ चे ०७/०० वा ते ०८/०० वा दरम्यान | दि ०२/१/२०२१ चे १२/४० वा | पुंडलीक महादेवराव माळकर वय १९ वर्ष रा - मोरळ पोस्टे कोहा ता बार्शी टाकळी जी अकोला | अज्ञात | पोउपनि गजानन काठेवाडे पोस्टे राजापेठ मो नं - ७९७२३४८८३९ | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे मीत्रासह रूममध्ये साफसफाई करीत असतांना कोहीनुर लॉजचे काउन्टरवर ठेवलेला त्याचा एसीआर कंपनिचा लँपटॉप १ Lan mac n c०१८५३७९७८ E २ .WLAN MAC ०४५६ E५A९DA६७ असलेला कि अं २५,०००/- रू चा कोणीतरी अज्ञात ईसमाने कोहिनुर लॉजचे उघडे असलेल्या मेन गेट मधुन येवुन चोरून नेला अशा फि चे जबाणी रीपोर्ट वरून सदरचा गून्हा दाखल करून तपासात घेतला |
| ८ | पोस्टे राजापेठ | अप क्र १३२३/२०२१ कलम ३५४, ३५४(अ) ३२३,५०४ भादवी | विनयभंग | -- | माया नगर जय भोले किराणा जवळ अमरावती | दि ०२/११/२१ चे ११/५० वा दरम्यान | दि ०२/१/२०२१ चे १५/१४ वा | एक महीला | रविद्र केशवराव रावतळे रा माया नगर अमरावती | पोउपनि गजानन काठेवाडे पोस्टे राजापेठ | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीने फिर्यादी चा मुलगा फिर्यादी हा लहान मुलासह खेळत असतांना नमुद आरोपीने त्यास धक्का देवुन लोटले त्यामुळे फिर्यादीचे वडीलांनी त्यास टोकले असता आरोपीने त्याना शिवीगाळ करून मारहान केली व फिर्यादी ही तीचे वडीलांना सोडविण्यास गेली असता फिर्यादीला विनयभंग करण्याच्या उद्देशाने तुला तर तुझी साडी सोडुन मारतो असे म्हणुन माझे छातीला हात लावुन ब्लाउज पकडुन ओढ़वाड केले व जोरात लोटुन दिले. त्यामुळे फिर्यादीचे मानत लज्जा उत्पन्न करून फिर्यादीचा विनयभंग केला व वडीलांना सुद्धा लोटुन दिले अशा फि चे जबाणी रीपोर्ट वरून सदरचा गून्हा दाखल करून तपासात घेतला |

## दिनांक ०३/११/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ६) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | फ्रेजरपुरा | अप. न. १७६५/ २०२१ कलम २९४,३२३, ५०६,३४ भादवि. | अश्लील शिवीगाळ करणे | नि रंक | सर्वोदय कॉलनी, कॉंग्रेस नगर रोड अमरावती | दि. ०१/११/२० २१ चे २०/३० वा. | दि. ०२/१०/२० २१ चे ०४/१२ वा. | एक महीला | १) जगन्नाथ तायडे २) एक महीला दोन्ही रा. सर्वोदय कॉलनी, कॉंग्रेस नगर रोड | भेट देणारे अधि व दाखल अधि.- पोउपनि राजमल्लु पो स्टे फ्रेजरपूरा अम दि. ०२/११/२०२१ | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी नातेवाईक असुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी ही ट्युशन घेवुन घरी परत आली असता यातील आरोपीतांनी फिर्यादीला म्हटले की तु एवढ्या वेळ कोणती ट्युशन घेते जेणे करुन रात्रीचे ०८/०० वाजते. तुला ट्युशन चा माज आला आहे. तु पैशे कमावत तर काय झाल. असे म्हणुन घराबाहेर येवुन फिर्यादीस अश्लील भाषेत शिवीगाळ केली व |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | अमरावती | चे ०३/३० वा. | मारण्या करीता छत्री हातात घेतली व फिर्यादीचे डोक्याचे केस ओढले व मारण्याची धमकी दिली. . अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| २ | गाडगे नगर अमरावती शहर | अप क्र २७६१/२०२१ कलम १८८, २६९, २७०, २७१,३४१, २९१ भादवि सहकलम २, ३, ४ साथीचे रोग अधिनियम सहकलम ५१-ब आपत्ती व्यवस्थापन अधिनियम सहकलम १३५ मपोका | आदेशाचे उल्लंघन करणे | ----- | जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | दि ०१.११.२०२१ चे ११.४० वा ते १२.४० वा दरम्यान | दि ०२.११.२०२१ चे ००.१० वा | सरतर्फे पोउपनि पंकज ढोके पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | १- किरणे पातुरकर २- जयंत डेहनकर ३- तुषार भारतीय ४- मंगेश खोडे ५- गजानन देशमुख ६- दिपक खताडे ७-शिवराय कुलकर्णी ८- सागर महल्ले ९- रविंद्र खांडेकर १०- डॉ अविनाश चौधरी ११- सचिन नाईक १२- संजय तिरथकर १३- चेतन गावंडे १४-एक महीला १५- लविना हर्षे १६- एक महीला १७- राजेश आखेगावकर १८- राजु मेटकर १९- जगदीश कांबे २०- विरेंद्र ढोबळे २१- प्रणीत सोनी | पोउपनि पंकज ढोके पोस्टे स्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि ०१.११.२०२१ चे ११.४० वा ते १२.४० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद भारतीय जनता पार्टी अमरावती शहर चे कार्यकर्ते यांनी अमरावती येथे शासकीय कॉलेज झालेच पाहिजे व इतर घोषणाबाजी केली जिल्हाधिकारी कार्यालयाचे समोरील सार्वजनिक मेन रोडवर कार्यकर्ते जमा होवुन सार्वजनिक रोडवरील वाहतुकीस अडथळा केला सोशल डिस्टसिंगचे पालन केले नाही तोंडाला मास्क लावला नाही कोरोना नियमांचे पालन केले नाही कोरोना विषाणु संसर्गासंबंधाने मा जिल्हा दंडाधिकारी अमरावती यांचा कक्ष -२७/गृहविभाग/कावि-२१२/२०२१ दि १३.०८.२०२१ अन्वये कलम १४४ जाफौ अन्वये आदेशान्वये सामाजिक, राजकीय कार्यक्रम, निषेध मोर्चा यास बंदी आदेशाचे तसेच मा पोलीस उपायुक्त मुख्यालय अमरावती शहर यांचा पोआअ/विशा/कावसु/२६३०/२०२१ कलम ३७-१,३मपोका दि १८/१०/२०२१ अन्वये प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन केले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | २२- एक महीला २३- प्रविण कौढण्या २४- सतिश कर्सिया २५- एक महीला २६- एक महीला २७- राजु राजदेव २८- एक महीला अधिक ३०-४० कार्यकर्ते | | |
| ३ | गाडगे नगर अमरावती शहर | अप क्र २७६२/२०२१ कलम १८८, २६९, २७०, २७१, २९१ भादवि सहकलम २, ३, ४ साथीचे रोग अधिनियम सहकलम ५१-ब आपत्ती व्यवस्थापन अधिनियम सहकलम १३५ मपोका | आदेशाचे उल्लंघन करणे | ----- | जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | दि ०१.११.२०२१ चे ११.३० वा ते १५.४० वा दरम्यान | दि ०२.११.२०२१ चे ०१.०९वा | सरतर्फे पोउपनि पंकज ढोके पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर | डॉ अनिल बोंडे २- एक महीला ३- प्रशांत शेगोकार ४- प्रविण तायडे ५- राजेश पाठक ६- ललीत समदुरकर ७- एक महीला ८- एक महीला रा मोर्शी ९- बादल कुलकर्णी १०- नरेंद्र राउत ११- उपम गदरेल रा परतवाडा अचलपुर जि अम अधिक १५०-१६० कार्यकर्ते | पोउपनि पंकज ढोके पोस्टे स्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि ०१.११.२०२१ चे ११.३० वा ते १५.४० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद भारतीय जनता पार्टी अमरावती ग्रामीण चे कार्यकर्ते यांनी पावसामुळे सोयाबिन, संत्रा, तुर, कापुस, व इतर पिकांचे नुकसान झाल्याने शासनाने शेतक-यांना मदत करावी शेतक-यांची विज जोडणीचे पैसे भरले त्यांना विज जोडणी देण्यात यावी, पांधन रस्त्याचे काम करावे २०२१ चे मदतीचे पैसे शेतक-यांच्या खात्यावर जमा करावे इत्यादी मागण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय येथे कार्यकर्ते एकत्र जमा होवुन सोशल डिस्टसिंगचे पालन केले नाही. तोंडाला मास्क लावला नाही कोरोना नियमांचे पालन केले नाही कोरोना विषाणु संसर्गासंबंधाने मा जिल्हा दंडाधिकारी अमरावती यांचा कक्ष -२७/गृहविभाग/कावि-२१२/२०२१ दि १३.०८.२०२१ अन्वये कलम १४४ जाफौ अन्वये आदेशान्वये सामाजिक, राजकीय कार्यक्रम, निषेध मोर्चा यास बंदी आदेशाचे तसेच मा पोलीस उपायुक्त मुख्यालय अमरावती शहर यांचा पोआअ/विशा/कावसु/२६३०/२०२१ कलम ३७-१,३मपोका दि १८/१०/२०२१ अन्वये प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन केले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | गाडगे नगर अमरावती शहर | अप क्र २७६३/२०२१ कलम १८८, २६९, २७०, २७१, २९१ भादवि सहकलम २, ३, ४ साथीचे रोग अधिनियम सहकलम ५१-ब आपत्ती व्यवस्थापन अधिनियम सहकलम १३५ मपोका | आदेशाचे उल्लंघन करणे | ----- | जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | दि ०१.११.२०२१ चे १२.३० वा ते १४.१५ वा दरम्यान | दि ०२.११.२०२१ चे ०१.२९ वा | सरतर्फे पोउपनि पंकज ढोके पोस्टे गाडगे न गर अमरावती शहर | १- डॉ अलिम पटेल २- एक महीला ३- अब्दुल रहीम राही ४- गोपाल ढेंगेकर ५- विठठलराव तंतरपाडे अधिक १५-२० कार्यकर्ते | पोउपनि पंकज ढोके पोस्टे स्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर दि ०१.११.२०२१ चे १२.३० वा ते १४.१५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद जय संविधान संघटनेचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्र येवुन सोशल डिस्टसिंगचे पालन केले नाही. तोंडाला मास्क लावला नाही कोरोना नियमांचे पालन न करता त्रिपुरा येथील मुस्लीम अल्पसंख्यांक समुदायावर होत असलेल्या अत्याचाराचे घटनेच्या विरोधात केंद्र सरकार तसेच भाजपाचे विरोधात घोषणाबाजी करून निदर्शने केली मा निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती यांना त्रिपुरा येथील मुस्लीमाविरूध्द हिंसाचाराबाबत स्वताहुन दखल व्हावी हिसांचाराबाबत RSS,VHP,बजरंग दल, हिंदु जागरण मंच, या संघटनाची चौकशी करून दोषी आढळल्याबाबत त्यांचेवर बंदी घालण्यात यावी इत्यादी मागण्याचे निवेदन मा निवारी उपजिल्हाधिकारी अमरावती यांना देण्यात आले. कोरोना विषाणु संसर्गासंबंधाने मा जिल्हा दंडाधिकारी अमरावती यांचा कक्ष -२७/गृहविभाग/कावि-२१२/२०२१ दि १३.०८.२०२१ अन्वये कलम १४४ जाफौ अन्वये आदेशान्वये सामाजिक, राजकीय कार्यक्रम, निषेध मोर्चा यास बंदी आदेशाचे तसेच मा पोलीस उपायुक्त मुख्यालय अमरावती शहर यांचा पोआअ/विशा/कावसु/२६३०/२०२१ कलम ३७-१,३मपोका दि १८/१०/२०२१ अन्वये प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन केले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

## दिनांक ०३/११/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (प्रोव्हीबीश्न) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा. | ८७६/२१ कलम ६५(ई) महा.दा.का. | अवैधरित्या विनापरवाना देशी दारू बाळगल्या वरून | ४८ नग देशी दारू संत्रा बाँबी कंपनीच्या प्रत्येकी १८० मि.ली.च्या सिलबंद पावट्या, कि. अं. २८८०/- | जयहिंद चौक, बडनेरा. | दि. ०२.११.२०२१ चे १८.१५ वा. | दि. ०२.११.२०२१ चे १९.५२ वा. | पो.हे.का. अब्दुल रहीम अब्दुल कदीर, वय २२ वर्षे, | गजानन रामदास मोहोड, वय ४० वर्षे, रा. कंपासपुरा, जुनी वस्ती, बडनेरा. | पो.हे.का. अब्दुल रहीम अब्दुल कदीर, वय २२ वर्षे, पो. स्टे. बड-ेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीद्वारे नमुद आरोपीवर पंचासमक्ष रेड केला असता त्याच्या हातातील पांढ-या रंगाच्या चुंगळीमध्ये ४८ नग देशी दारू संत्रा बाँबी कंपनीच्या प्रत्येकी १८० मि.ली.च्या सिलबंद पावट्या, कि. अं. २८८०/- रू. चा माल |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रू. चा माल. | | | | पो. स्टे. बडनेरा. | | १८.१५ वा. ते १८.४५ वा. | अवैधरित्या विनापरवाना मिळुन आला. सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(ई) महा. दा. का. प्रमाणे गुन्हा होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| २ | गाडगेनगर | अप.क्र. २७६४/२१ कलम ६५ (ई).मदा.का. | अवैद्यरित्या दारु विक्री करणे | एकुण ९० एम.एल.च्या देशी दारु बाँबीच्या १५०/- रु. प्लास्टीकच्या बाँटल कि.अं. ४५००/- रु चा सदर आरोपी घेवुन जात असातना व १८० एम.एल या आफीसर चाईस ब्लु काचेच्या ४० नग कि.अं. ६०००/- रु व स्कुटी पेप विना नंबरची कि.अं. २००००/- रु. असा एकुण ३०,५००/- रु. | रेखा कालनी अमरावती | दि. ०२.११ .२०२१ चे १२.४० वा | दि. ०२.११ .२०२१ चे १६.०७ वा | सरतर्फ पो.उप.नि. ढोके पो.स्टे.गाडगेनगर अमरावती | नितीन देवदास लोखंडे रा. पुसदा जि.अमरावती २) विकास हिम्मतराव शंकरपाळे रा. पुर्णानगर अमरावती | पो.उप.नि. ढोके पो.स्टे.गाडगेनगर अमरावती दि. ०२.११.२०२१ चे १२.४०वा ते १३.०५ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा त्याची गाडी क्र. विना नंबरची गुलाबी कलरची स्कुटी पेप ने दारु घेवुन जातांना आढळुन आला व त्याचेकडे एकुण ९० एम.एल.च्या देशी दारु बाँबीच्या १५०/- रु. प्लास्टीकच्या बाँटल कि.अं. ४५००/- रु चा सदर आरोपी घेवुन जात असातना व १८० एम.एल या आफीसर चाईस ब्लु काचेच्या ४० नग कि.अं. ६०००/- रु व स्कुटी पेप विना नंबरची कि.अं. २००००/- रु. असा एकुण ३०,५००/- रु.चा माल घेवुन जाताना आढळुन आले. अशा फि.च्या लेखी रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| ३ | वलगाव | ६९३/२०२१ कलम ६५ (ई) मप्रोका | अवैध्यरित्या देशी दारुची विक्री करणे | ०९ नग देशी दारुची ५८५/ रुपये | ग्राम जावरा | ०२/११/२०२१ चे १८/०५ वा. | ०२/११/२०२१ चे १८/५६ वा. | ASI चंदन मोरे ब.न १०४१ पोस्टे वलगाव अमरावती शहर | संजय नथ्थुजी तायडे वय ५५ वर्षे रा.ग्राम जावरा | ASI चदन मोरे ब.न १०४१ पोस्टे वलगाव अमरावती शहर दि.०२/११/२०२१ चे १८/०५ वा. दाखल अधिकारी ३ASI दादु दहीकर ब.न ९१९ पोस्टे वलगाव अमरावती शहर. | हकीकत अशा प्रकारे आहे की, गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, यातील नमुद आरोपी अवैध्यरित्या देशी दारुची विक्री करीत आहे वरुन यातील नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता यातील नमुद आरोपी हा अवैध्यरित्या देशी दारुची विक्री करीत असताना मिळुन आला त्याचे ताब्यातुन ०९ नग देशी दारुच्या पावट्या प्रत्येकी १८० मि.ली च्या किंमत अंदाजे ५८५/ रुपयाचा माल मिळुन आला व तो पंचासमक्ष जप्त करण्यात आला वरुन यातील नमुद आरोपीविरुद्ध कलम ६५ (ई) मप्रोका प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

**दिनांक ०३/११/२०२१ रोजी अकस्मात मत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर**

| अ क्र | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | बडनेरा. | ७२/२०२१ कलम १७४ जा. फौ. | बेवारस<br><br>फिर्यादी - राजेंद्र नानाजी बडनेरकर, वय ५३ वर्षे, रा. अंजनगाव बारी, अमरावती. | अंजनगाव बारी शिवारात शेत सर्वे नं. २१० | अनोळखी इसम, अंगावर अळया पडलेल्या स्थितीत, अंगावर निळया रंगाचा शर्ट व पांढ-या रंगाची लुंगी . | अंदाजे ४० ते ५० वर्ष वयोगटात ील इसम | पुरूष | पो.नि. पंजाब वंजारी, ASI अहमद अली, ब.न. ७८४ | हकीकत अशाप्रकारे आहे की, फिर्यादी नामे राजेंद्र नानाजी बडनेरकर, वय ५३ वर्षे, रा. अंजनगाव बारी, अमरावती यांचे अंजनगाव बारी शिवारात शेत सर्वे नं. २१० वर पाच एकर शेत असुन दि. ०२.११.२०२१ चे ११.०० वा. दरम्यान तणनाशक फवारणी करण्याकरिता गेले असता त्यांच्या शेतात असलेल्या जुन्या विहीरीत एक पुरूष जातीच्या अंदाजे ४० ते ५० वर्ष वयोगटातील अनोळखी इसमाचे प्रेत दिसुन आले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. |
| २ | राजापेठ | मर्ग क्र ७०/२१ कलम १७४ जाफौ | वारस | जिल्हासामान्य रुग्णालय अमरावती<br><br>घ.ता.वेळ<br>दि.०२/११/२१ चे १२/०० वा<br>दा.ता.वेळ<br>दि.०२/११/२१ चे २२/५० वा | एक महीला | २१ वष | स्त्री | ASI सतीश रायचंद ब.न.८२४ पोस्टे राजापेठ<br><br>दी.०२/११/२१ चे १४/०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील मृतक मागील दोन वर्षा पासुन निट ची परीक्षा देत होती.तिने संप्टेबंर २०२१ ला निटची परीक्षा दिली होती .तिचा आज दि.२/११/२१ ला निट चा निकाल येणार होता .मृतक चे वडील भारत कोरडे यांनी तिला निट चा निकाल आला का असे विचारले .तिने यायचा आहे असे सांगुऩ आघोऴ करणे करीता बाथरुम मध्ये गेली .खुप वेऴ झाल्यावरील परत न आल्याने मृतकची लहान बहीण ही मृतक हीला बोलाविण्याकरीता गेली असता मृतक ने प्रतीसाद दिला ऩाही.बाथरुमचा दरवाजा थोडा उघडळा असल्याने तिने आत पाहीले असता ति शावरच्या साह्याने गळफास घेवुन लटकलेली दिसली.तिने आरडा ओरडा केल्याने मृतकचे आई वडील तेथे आले व त्यांनी खाली काढुन उपचराकरीता रिम्स हॉस्पिटल येथे भर्ती केले व उपचारा दरम्यान तिचा मृत्यु झाला. पोस्टे ला मयत हीचा मरणाचा नमेमो प्राप्त झाल्या वरुन सदरचा मर्गदाखल करुन तपासत घेतला. |

दिनांक ३१/१०/२०२१ ते ०७/११/२०२१ रोजी पर्यंत मा.सेशन कोर्टात होणाऱ्या प्रकरणाची माहीती निरंक आहे